**Time : 2½ Hours** **MARATHI (F.L.)**

**Subject Code**

| S | 1 | 1 | 2 |
|---|---|---|---|

**Total No. of Questions : 10** **(Printed Pages : 10)** **Maximum Marks : 80**

***सूचना :*** (*i*) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहा.

(*ii*) प्रश्नांना क्रमांक व उपक्रमांक स्पष्ट लिहा.

(*iii*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*iv*) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

1. (अ) 'अ' स्तंभातील पाठांची नावे व 'ब' स्तंभातील लेखकांची नावे यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : 2

| **'अ' स्तंभ** | **'ब' स्तंभ** |
|---|---|
| (*i*) स्त्रीपुरुष तुलना | (अ) बाजीराव पेशवा. |
| (*ii*) आजुनही आठवतात | (ब) इंदुमती जोंधळे. |
| | (क) ताराबाई शिंदे. |
| | (ड) प्र. ई. सोनकांबळे. |

(ब) पुढे दिलेल्या विधानांशी संबंधित असे प्रत्येकी **चार** पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून ते विधान पूर्ण करुन लिहा. 2

(*i*) एकोणिसाव्या शतकात स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन ................................................ .

(अ) विषम होता.

(ब) समान होता.

(क) प्रेमळ होता.

(ड) उदार होता.

(*ii*) खात्याच्या रिमांड होम मध्ये आम्ही ......................... .

(अ) बेवारस म्हणून दाखल झालो.

(ब) सनाथ म्हणून दाखल झालो.

(क) अनाथ म्हणून दाखल झालो.

(ड) कोर्ट केमिटेड म्हणून दाखल झालो.

(क) पुढीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 3

(*i*) कोणाच्या राज्यात सुगंधाला बंदी होती ?

(*ii*) लेखकांनी उद्‌गीरला काय काय पाहिले ?

(*iii*) आजन्म बटीकाप्रमाणे कोणाला राहावे लागते ?

(*iv*) 'तसे मिळालेले कपडे पेटीचेच धन झाले' यातील पेटीचेच धन झाले' म्हणजे काय ?

2. पुढीलपैकी कोणत्याही **एका** वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : 3

(*i*) 'ऐसा शक्तीयुक्त परमेश्वरू ॥'

(*ii*) विज्ञान हा तुम्ही निसर्गाशी खेळत असलेला कधीही न संपणारा खेळ आहे.

(*iii*) ''आता पयल्यागत न्हाय ऱ्हायल्या चिमाण्या कुठे दिक्कोपाल झाल्यात.''

3. पुढीलपैकी कोणत्याही **तीन** उपप्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **सहा** ते **सात** वाक्यांत लिहा : 9

(*i*) बाजी रेठरेकरांचा मृत्यू केव्हा, कोठे व कसा झाला ?

(*ii*) ग्रामीण भागातील स्त्रियांचे मनोरंजन बहुरूपी कसे करतो ?

(*iii*) मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी लोकमान्य टिळक यांनी कोणते उपाय सुचवले आहेत ?

(*iv*) इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र या विषयांनी आपली कैफियत कशाप्रकारे मांडली ?

4. (अ) 'अ' स्तंभातील कवितांची नावे व 'ब' स्तंभातील कवींची नावे यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : 2

| 'अ' स्तंभ | 'ब' स्तंभ |
|---|---|
| (*i*) सत्पुरुषलक्षणे | (अ) बा.भ. बोरकर |
| (*ii*) देखणी ती जीवने | (ब) लहू कानडे |
| | (क) वामन पंडित |
| | (ड) रफीक सूरज |

(ब) पुढे दिलेल्या अपूर्ण विधानांशी संबंधित असे प्रत्येकी **चार** पर्याय दिले आहेत. त्यापैकी अचूक पर्याय निवडून ते विधान पूर्ण करून लिहा. 2

(*i*) चातक पक्षी भूतळी .................. .................... .

(अ) चंद्रामृत इच्छितो.

(ब) पाणी इच्छितो.

(क) भक्ती इच्छितो.

(ड) ढग इच्छितो.

(*ii*) षड्‌रिपूंमधील काम-क्रोध या भावनांना ........................ .

(अ) विषाची उपमा दिली आहे.

(ब) सद्‌गुणांची उपमा दिली आहे.

(क) विंचवाची उपमा दिली आहे.

(ड) अमृताची उपमा दिली आहे.

(क) पुढीलपैकी कोणत्याही **दोन** उपप्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 2

(*i*) चेहरा सुंदर दिसण्यासाठी कवींच्या मते कोणत्या गोष्टीला महत्त्व नाही ?

(*ii*) शांती धारणा केल्यामुळे कोठे उतरता येईल ?

(*iii*) भ्रमर कोणाविणा प्राण सोडतो ?

(*iv*) विंचू चावल्यामुळे कोणता घाम अंगाशी आला ?

5. (अ) पुढीलपैकी कोणत्याही **एका** अवतरणाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : 3

(*i*) गौळणी त्या तोंडा भूललिया ॥

(*ii*) तरी तू माझा वारस होऊ शकत नाही.

(ब) पुढीलपैकी कोणत्याही **दोन** उपप्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **पाच** ते **सहा** वाक्यांत लिहा : 6

(*i*) मुलाच्या डोळ्यांत आईच्या आठवणीने पाणी येते तेव्हा तिच्याबद्दल कोणत्या गोष्टी आठवतात ?

(*ii*) मुले भयकंपित का झाली ?

(*iii*) मोकळ्या मैदानात कोणते बदल होत असलेले कवींना दिसतात ?

6. (अ) पुढील उपप्रश्न सोडवा :

(*i*) पुढीलपैकी कोणत्याही **एका** सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा : 2

(अ) चौखुर.

(ब) गजानन.

(ब) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखून प्रकार लिहा : 2

एक <u>सुंदर</u> हरीण त्याच्या<u>कडं</u> डुलत-डुलत येत होता.

(क) पुढीलपैकी कोणत्याही **दोन** वाक्प्रचारांचा अर्थ लिहून त्या वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा : 4

(*i*) पाणी सोडणे.

(*ii*) सलगी करणे.

(*iii*) तोंड वेंगाडणे.

(*iv*) उरी फुटून मरणे.

7. (अ) कंसातील सूचनेनुसार बदल करून लिहा : 4

(*i*) चिमण्यांची संख्या कमी झाली. लेखक अस्वस्थ झाले.

(संयुक्त वाक्य करा.)

(*ii*) बहुरूपी हंगामाच्या दिवसात गावात येतात. लोकांचे मनोरंजन करतात.

(केवल वाक्य करा.)

(*iii*) त्या भाषेंतच आमचा जल्म झाली.

(वाक्य शुद्ध करुन लिहा.)

(*iv*) छे मला खूप दिवसापास्नं ही नो मॅन्स लॅण्ड पाहायची होती

(योग्य विरामचिन्हांचा वापर करा.)

(ब) पुढीलपैकी कोणत्याही **एका** अलंकाराचे लक्षण व उदाहरण लिहा : 2

(*i*) अनुप्रास.

(*ii*) रूपक.

8. (अ) पुढील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

ग्रंथालय हे आजचे देवालय आहे आणि कपाटातील ग्रंथ हे देवालयातील जागते दैवत आहे. दैवत मानण्यात आमच्या मनात भाविकता होतीच. परंतु ''देवाचिये द्वारी उभा क्षणभरी। तेणे मुक्ती चारी साधीयेल्या'', याच्या पालीकडे काहीतरी आम्हांला मिळत होते. देवळाच्या पायरीवर किंवा पारावर क्षणभर बसल्यानंतर परस्परांच्या सहानुभूतीने भेदभावरहित असे क्षेमकुशल आम्हांला करता येत होते. पंचक्रोशीतील वर्तमान आम्हांला कळत होते; परंतु जीवनाची वाढ आता इतकी झाली आहे की, पंचक्रोशीची मर्यादा आता पंचखंडावर गेली आहे आणि आता आमच्या मनाला या पंचखंडांतील मानवाच्या क्षेमकुशलाची ओढ लागली आहे. देवाच्या पायरीवर बसून हेच क्षेमकुशल आम्हांला आता कळणार नाही. त्यासाठी तितक्याच भव्य देवालयाकडे धाव घ्यावी लागते. ग्रंथालय हेच ते भव्य देवालय होय. तेथे लहान, थोर, मुले, बायका सारी माणसे धाव घेतात, परंतु ग्रंथालयातील दैवत जागते आहे. देवळातील देवाचे देवत्व तुमच्या–आमच्या मानण्यावर आहे परंतु ग्रंथालयातील दैवते तुम्ही माना अगर मानू नका, त्यांचे देवपण चिरंजीव आहे. देवाचे दर्शन तरी आम्ही कशासाठी घेतो ? आम्हांला काहीतरी मार्गदर्शन हवे असते. जिवाची तगमग शांत व्हावी असे वाटत असते. ग्रंथालयातील दैवतांचे दर्शन घेताना आमच्या मनाला नेमके हेच हवे असते.

**प्रश्न :**

(*i*) लेखकाच्या मते आजचे देवालय कोणते व त्यातील दैवत कोणते ? 1

(*ii*) पंचक्रोशीतील वर्तमान आम्हांला कुठे बसल्यावर कळायचे ? 1

(*iii*) आमच्या मनाला कशाची ओढ आहे असे उताऱ्यात म्हटले आहे ? 1

(*iv*) देवाचे दर्शन आपण कशासाठी घेतो ? 1

(*v*) उताऱ्याला योग्य शीर्षक लिहा. 1

**किंवा**

वरील उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश लिहा व त्याला समर्पक शीर्षक लिहा : 5

(ब) पुढील कविता वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

रे, अजून थोडे सोस मना
जळल्यावाचुन नाही ज्योती
कढल्यावाचुन नाही मोती
रडल्यावाचुन नाही प्रीती
नच घणावाचुनी देवपणा !

प्रसववेदनेविण ना सृष्टी
तपनावाचुनी नाही वृष्टी
दु:खाविण ना जीवनदृष्टी
मेल्याविण मिळाला स्वर्ग कुणा !

दातांनी जरी जीभ चावली
कुणी बत्तिशी सांग तोडली
सगळी ही आपुलीच मंडळी
मग शब्द कशाला उणादुण !

घरटे तुटता खुले दिगंतर
मोह संपता, आप्त चराचर
सोससोसता सासर हो घर
अद्‌भुत या परि हरिची करुणा !

**प्रश्न :**

(*i*) कशावाचून देवपण मिळत नाही ? 1

(*ii*) मेल्याशिवाय काय पाहायला मिळत नाही ? 1

(*iii*) आपण कुणाला उणादुणा शब्द का देऊ नये ? 1

(*iv*) कवितेला योग्य शीर्षक लिहा. 1

9\. (अ) खालील संवाद एक सुशिक्षीत तरूण व एक शेतकरी यांच्यात घडून आलेला आहे. तो तुमच्या शब्दांत पूर्ण करून लिहा : 4

संकेत : ''काय हो काका, कुठे निधालात तुम्ही ?''

शांताराम : ''सशाच्या .................... .................... .''

संकेत : ‘‘त्या गरीब प्राण्याची ………………… .’’

शांताराम : ‘‘आम्हा शेतकऱ्यांना ………………… .’’

संकेत : ‘‘तुम्हाला माहित नाही वन्य प्राण्यांची शिकार ………………… ………………… ………………… .’’

शांताराम : ‘‘म्हणजे काय रे ?’’

संकेत : ‘‘सरकार वन्य प्राण्यांची हत्या केल्यास ………………… ………………… .’’

शांताराम : ‘‘आमचे नुकसान होते मग आम्ही ………………… ………………… ……… .’’

संकेत : ‘‘त्यासाठी तुम्ही काहीतरी दुसरा उपाय ………………… ………………… .’’

शांताराम : ‘‘मग आम्ही सशाला ………………… .’’

संकेत : ‘‘नाही तुम्ही पकडूनही ठेवू शकत नाही.’’

शांताराम : ‘‘बर झालं, तू मला वेळीच योग्य ती …………………………………… .’’

(ब) प्रणव/पल्लवी खरबे, जुना बाजार, फोंडा-गोवा. हा/ही आपला मित्र/मैत्रिण सौरभ/संध्या ह्याला/हिला राज्य पातळीवरील कबड्डी स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळाडू म्हणून पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्याचे/तिचे अभिनंदन करीत आहे. पत्राचा नमुना तयार करून लिहा. 7

**किंवा**

निलम/निरंजन फडते, विद्यार्थी प्रतिनिधी, सरस्वती विद्यालय, म्हापसा-गोवा येथून अंधश्रद्धा निर्मुलनासंबंधीत मार्गदर्शन केल्याबद्दल अंधश्रद्धा निर्मुलन समिती, म्हापसा-गोवा यांचे आभार मानणाऱ्या पत्राचा नमुना तयार करून लिहा.

(सूचना : पत्रात स्वत:च्या नावाचा उल्लेख करू नका)

10 पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर **250** शब्दांपर्यंत निबंध लिहा : 12

(*i*) रम्य ते बालपण !

(*ii*) मी संत बोलतोय

(*iii*) भ्रमणध्वनी (मोबाईल) नसते तर .................. .

(*iv*) लोकसंख्या वाढ-एक समस्या !